।। दुरितांचे तिमिर जावो ।।

# जवाहर वार्तापत्र

संपादक : प्राचार्य डॉ. उमाकांत घनशेट्टी　　कार्यकारी संपादक : प्रा. डॉ. संजय कुलकर्णी

अंक : १ ले　वर्ष : १ ले　पान : ४　खाजगी वितरणा करीता　वार : शनिवार　दिनांक : १५ डिसेंबर २०१८

## संपादकीय....

आदरणीय श्री. सि.ना. आलुरे गुरूजींनी ''दुरितांचे तिमिर जावे'' या उक्तीप्रमाणे उपेक्षित आणि वंचितांच्या अंध:कारमय जीवनात ज्ञानरूपी किरणांनी त्यांचे जीवन प्रकाशमान करण्यासाठी जून १९५९ साली 'शिक्षण प्रसारक मंडळाची' स्थापना केली. जून २०१९ साली संस्था साठ वर्षे पूर्ण करीत आहे. या साठ वर्षात संस्थेच्या १२ माध्यमिक, २ उच्च माध्यमिक, १ रात्रशाळा, १ वरिष्ठ महाविद्यालय व वसतिगृहे असा विस्तार झाला आहे.

अनेक गोरगरिबांची मुले या संस्थेत शिकून उच्च पदस्थ अधिकारी, डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, शिक्षक, वकील, उत्तम राजकारणी, समाजधुरिणी झाले आहेत. मराठवाड्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात 'अणदूर'च्या शैक्षणिक प्रगतीची नोंद झाली आहे. व्रतस्थ कर्मयोगी, कृतिशील विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ म्हणून गुरूजी संपूर्ण महाराष्ट्रालाच नव्हे तर शेजारच्या कर्नाटक-आंध्र राज्यातही ते सर्वश्रुत आहेत. वंदनीय आहेत.

अशा थोर व्यक्तीच्या संस्थेत आपण सर्वजण काम करीत आहोत. शिकत आहोत. काम करण्याची आणि शिकण्याची संधी मिळाली हे आपले भाग्य आहे. गुरूजींच्या सहवासामुळे, प्रेमामुळे अनेकांचे जीवन 'समृद्ध' झाले आहे. ज्या ज्या व्यक्तींना त्यांचा परिसस्पर्श झाला त्या त्या व्यक्तींचे जीवन सुवर्णासारखे उजळून निघाले.

आपल्या संस्थेच्या अनेक शाखा आहेत. या सर्व शाखेतील विद्यार्थी, शिक्षक व पालक एकमेकांच्या संपर्कात रहावे, प्रत्येक शाखेत काही ना काही नवोपक्रम शिक्षक व विद्यार्थी राबवित असतात. त्याची माहिती व्हावी. गुणवंत व यशस्वी विद्यार्थी, शिक्षकांचे कौतुक करावे, विद्यार्थी व शिक्षकांना लिहिते करावे, ते वाचते व्हावे, संस्थेच्या सर्व शाखा एकमेकांना जोडल्या जाव्यात म्हणून ''जवाहर वार्तापत्र'' सुरू करीत आहोत.

ज्या मातेच्या संस्कारातून, मुशीतून गुरूजी घडले त्या मातेच्या पुण्यस्मरणाचा हा दिवस.

१५ डिसेंबर कै. लोकमाता अक्का उर्फ श्रीमती लक्ष्मीबाई नागप्पा आलुरे या आदरणीय गुरूजींच्या मातोश्री. यांच्या पुण्यस्मरणाच्या दिवशी 'जवाहर वार्तापत्र'चा पहिला अंक प्रकाशित करीत असताना मनस्वी आनंद होत आहे.

''ज्ञान दूर कुछ क्रिया भिन्न हैं इच्छा क्यो पुरी हो मनकी ।<br>
एक-दुसरे से न मिल सके यह विडंबना है जीवन की ।।

खऱ्या जीवनाची विडंबना हीच आहे की आपण एकमेकांच्या संपर्कात येत नाही. मिळत-मिसळत नाही. एकमेकांच्या संपर्कात आल्यानंतर विचारांची देवाण-घेवाण होते. विचारांची श्रीमती वाढते. कै. लोकमाता आक्कांचे विचार उच्च होते. जाती-पातीच्या विरूद्ध होते. सामान्य माणूस हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. या मातोश्रीच्या सत्कर्म आणि शुद्ध आचरणातून गुरूजी घडले. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची सेवा केली. शिक्षण प्रसारक मंडळाचे वटवृक्षात रूपांतर झाले. हा वटवृक्ष आज आकाशाला गवसणी घालत आहे. या वटवृक्षाखाली ज्ञान संपादन करणाऱ्या शिक्षक विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचे तार छेडले जावेत हेच 'जवाहर वार्तापत्र' प्रकाशित करण्याचे एकमेव उद्देश आहे.

ज्ञानाबरोबर कर्तव्यपरायण होऊन जगण्यावरती प्रेम करावे, जग फार सुंदर आहे. या उक्तीप्रमाणे-

प्रेम कर जगण्यावरी, जग फार सुंदर आहे ।<br>
अमावस्येच्या काळोखातही, नक्षत्रांचे झुंबर आहे ।

ज्या लोकमाता आक्कांनी दुरितांच्या जीवनातील अंधार घालवून प्रकाशाचा नंदादीप तेवत रहावा म्हणून आयुष्यभर झटणाऱ्या कै. लोकमाता आक्कांना विनम्र अभिवादन करण्यासाठी हा पहिला अंक प्रकाशित होत आहे. या अंकाचे सर्व स्तरातून स्वागत होईल. ही अपेक्षा!! धन्यवाद.

## देवतातुल्य माता : लक्ष्मीबाई


– सिद्रामप्पा नागप्पा आलुरे गुरुजी

माझ्या आईचे नाव श्रीमती लक्ष्मीबाई नागप्पा आलुरे आहे. कै. लोकमाता आक्का उर्फ लक्ष्मीबाई नागप्पा आलुरे.

माझ्या आईचे माहेर गावातच अणदूर हेच आहे. त्या कै. निलाप्पा चौधरी यांच्या कन्या. त्यांच्या आईचे नाव बसव्वाबाई होते. हे चौधरी घराचे मूळचे रा. तांदुळवाडी जि. सोलापूर येथील. माझे आजोबा निलाप्पा चौधरी हे अणदूरला आले. ते निलेगावचे देशमुखांची अणदूर येथील जमीन करीत होते. त्यांना एक मुलगा आप्पाराव निलाप्पा चौधरी व पाच मुली १) रेवाबाई २) नरसाबाई ३) लक्ष्मीबाई ४) पद्माबाई ५) नागाबाई असे होते.

अणदूर येथील महादप्पा तोटप्पा आलुरे यांना दोन मुले होती. थोरले रामचंद्र महादप्पा आलुरे व धाकटे माझे वडील नागप्पा महादप्पा आलुरे होते.

रामचंद्र आलुरे यांना माझी थोरली मावशी रेवाबाई यांना दिले होते. त्यांना मुलगी सोनाबाई व मुलगा निलकंठप्पा या दोन अपत्यानंतर त्या वारल्या. त्यावेळी सोनाबाई पाच वर्षाच्या व निलकंठप्पा तीन वर्षाचे होते. पुन्हा माझी मावशी नरसाबाई यांना केले. त्यांना एक मुलगी रेवाबाई, नंतर त्याही वारल्या. मावशी वारल्या तेव्हा मुलगी रेवाबाई दोन वर्षाच्या होत्या. या सर्वांचा सांभाळ माझ्या आईने केला. या ठिकाणी मला एका म्हणीची आठवण होते, आई मरो व मावशी तारो, माझे वडील मी पाच वर्षाचा असताना वारले. माझ्या आईला चार मुली व दोन मुले. मी व धाकटे भाऊ बसवणप्पा. आम्हा मुला-मुलींपेक्षा बहिणीच्या परदेशी मुलांवर त्यांचा जास्त जीव होता. माझे चुलते रामचंद्र घरचे प्रमुख होते. आमचे एकत्र कुटुंब होते. घरच्या प्रमुख आई होत्या. आमच्या घरात वडिलांची



मावशी, त्यांचेही नाव लक्ष्मीबाई होते. त्यांना कुणीही सांभाळणारे नसल्यामुळे त्या आमच्या घरीच रहात होत्या. त्यांची सर्व देखभाल आईच करीत असत.

त्याचप्रमाणे आमच्या एकुलत्या एक आत्या सातव्वाबाई सिद्रामप्पा दुर्ग. यांना एक मुलगी होती. आत्याचे पती वारले होते म्हणून त्याही आमच्या घरी रहात होत्या. त्यांनाही आईप्रमाणे वागवीत. अशा प्रकारे माझ्या चुलत्यांच्या मार्गदर्शनाखाली आक्का त्या सर्व कुटुंबाला चालवीत होती. कुणालाही कधीही दुखावले नाही. त्यांच्या या प्रेमळ वागण्यामुळे घरातील सर्वच त्यांना आक्का म्हणायचे.

त्यांना लोकांना जेवू घालण्याची व अन्नदान करण्याची फार आवड होती. ती कधीही जातपात मानत नव्हती. गावात मातंग समाजाचे लोक रामोशी म्हणून गावरक्षणाचे काम करीत असत. त्यांच्यापैकी बंडा गायकवाड हे प्रमुख होते. ते काही कामानिमित्त आमच्या घरी आले असता, मी आईला म्हणालो, बंडा मांग आला आहे, तेव्हा आईने मला सांगितले की, 'ते तुझ्यापेक्षा मोठे आहेत. तेव्हा त्यांना बंडामामा म्हणावे' हा उपदेश केला.

आमचे शेतकरी कुटुंब असल्याने शेतात बैलाचा गोठा असे. रक्षणासाठी कुत्री पाळली जात होती. या कुत्र्यांसाठी आई दररोज भाकरी घेऊन जायची व स्वत: कुत्र्यांना भाकरी टाकायची. इतरवेळी टाकण्यासाठी एका डब्यात भाकरी ठेवायची. कुणी वाटसरू अचानक आला तर त्याला जेवणासाठी एका डब्यात भाकरी, शेंगदाण्याची चटणी, कांदा व शेंगदाणे ठेवलेले असत.

आई स्वत: जनावराचा गोठा झाडलोट करी व शेणापासून गोवऱ्या थापत असे. गोवऱ्या जास्त जमल्यानंतर त्या एका ठिकाणी रचून त्याला शेण लावून थोपून उडवा तयार करीत असे.

आईचे शेतात काम करणाऱ्या बैलावर व दूध देणाऱ्या गाई व म्हशीवरही प्रेम असे. एक मोठी गाय होती. या गायीने तीन खोंड व दोन कालवडील जन्म दिला होता. तिच्यावर ती खूप प्रेम करायची. ती म्हातारी झाल्याने थकली. तेव्हा तिला भुसा व पेंड द्यायची व हिरवी वैरण टाकायची. त्यावेळी आपाशा नावाचा एक बैल म्हातारा झाला व तो मृत्यूच्या दारात होता व शेवटी मेला. त्यावेळी त्या बैलाने खूप कष्ट केले म्हणून ती त्याच्याजवळ बसून रडत होती. त्या मेलेल्या बैलाला कापू न देता त्याला पुरण्यास सांगितले.

गावी चौथीपर्यंत शाळा असल्याने पाचवी ते सातवीपर्यंतचे शिक्षण घेण्यासाठी नळदुर्गला मी पायी जाऊन येऊन केले. सकाळी मी जाण्यापूर्वी आई स्वयंपाक करून मला जेवू घालून माझ्याबरोबर डबा द्यायची. माझे पुढील आठवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण तुळजापूरला झाले. मी पुढे शिकावे अशी घरी सर्वांचीच इच्छा होती. आम्ही निजामी राजवटीत असल्याने आमचे शिक्षणाचे माध्यम इ.स. १९५० पर्यंत उर्दू होते. त्यामुळे बाहेर जाता येत नव्हत. इ.स. १९४९-

१९५२ पर्यंत तुळजापूरला हाताने स्वयंपाक करून जेवण करून शिकलो.

इ.स. १९४८ मध्ये पोलीस ॲक्शन झाली. रझाकारी निजामी राजवट संपली. मराठवाड्यात सर्व शाळांमधून इ.स. १९५० -१९५१ पासून मराठी माध्यम सुरू झाले. इ.स. १९५२ सालची मॅट्रीकची परीक्षा मराठीत झाली. ती मराठी माध्यमाची पहिली परीक्षा होती. मी पास झालो.

इ.स. १९५२-५३ मध्ये मला सोलापूर येथील दयानंद महाविद्यालयात सायन्स विभागात प्रवेश मिळाला. घरची आर्थिक परिस्थिती साधारण असल्याने सोलापूरचा खर्च झेपण्यासारखा नसल्याने दररोज अणदूरहून सोलापूरला एस.टी.ने. जेवणाचा डबा येत असे. हा जेवणाचा डबा सकाळी सात वाजता एस.टी.त ठेवावा लागत असे.

म्हणजे सकाळी सात वाजता डबा तयार करून देणं भाग होतं. सकाळी सात वाजता स्वयंपाक तयार करून डबा भरून देण्याचे कष्ट माझी आई लक्ष्मीबाई व आत्या सातव्वाबाई, तसेच वहिनी सोनाबाई करीत असत. सतत चार वर्षे हा डबा न चुकता दिल्यामुळे मी बी.एस्सी. इ.स. १९५६ साली झालो. माझ्या शिक्षणासाठी दररोज सकाळी ७ वाजता एस.टी. डबा देण्यासाठी बस स्टँडपर्यंत माझे चुलते (बाबा) रामचंद्र आलुरे यांनी हे कष्ट घेतले. या सर्वांच्या ऋणातून मी या जन्मी मुक्त होणे कठीण आहे.

मी इ.स. १९५६ ला बी.एस्सी. झाल्यानंतर माझ्या लग्नाचा विचार सुरू झाला. माझे चुलत भाऊ निलकंठप्पा यांनी मुलगी पाहण्यास सुरूवात केली. परंतु माझ्या आईची इच्छा त्यांनी लहानपणी सांभाळलेल्या दोन चुलत वहिणी सोनाबाई बचाटे (रा. मंगरूळ) व रेवाबाई साखरे (रा. जेवळी) या दोघींच्या दोन मुली आम्हा दोघा भावांना करण्याचा आग्रह धरला. त्याप्रमाणे मला जेवळीची व भाऊ बसवणप्पा यांना मंगरूळची करण्यात आली. त्यावेळी आईला खूप आनंद झाला. मला मूलबाळ न झाल्याने ती दुःखी होती. भावाला तीन मुले व दोन मुली आहे. त्याचा आनंद होता. शाळेतील व मुला-मुलींच्या वसतिगृहातील मुलांवर आईचे फार प्रेम होते. वेळ अमावस्या व कारहुणवी या सणाला मुला-मुलींना जेवायला बोलवत असत.

माझ्या आईला मी काशी, रामेश्वर, शिंगणापूर, परळी, गाणगापूर यासारख्या देवस्थानला गावातील महिला जात असताना जाण्यासाठी विचारले असता ती म्हणायची की 'माझ्या घरातच माझे सर्व देव असताना मी कशाला जाऊ?' त्यांनी आयुष्यात कुठलीही तीर्थयात्रा केलेली नाही. यातच त्यांना समाधान होते.

आमच्या शेतात जो भाजीपाला असेल तो आणल्यानंतर शेती नसलेल्या कुटुंबांना देत असे. उदा. मेथी, शेपू, मटकी, भेंडी, रताळी इत्यादी त्या कधीही भाजी विकत नसत.

आमच्या शेतात आंबराई होती. वर्षाला कमीत कमी आठ ते दहा हजार आंबे यायचे. माझे बाबा व आई आंबे कधीच विकत नसत. ज्यांना आंबे नाहीत अशांना आंबे देत असत. तसेच लोकांना बोलावून आंबे खाऊ घालत असत. विशेषत: मागास व गरिबांना देण्यात त्यांना फार आनंद वाटे.

शेतात हुरडा झाल्यापासून तो संपेपर्यंत हुरडा भाजून आणण्याचे काम बाबा करीत व आणलेला हुरडा शेती नसलेल्या लोकांच्या घरी देण्याचे काम आई करीत असे. त्यामुळे लोकांचे माझ्या आईवर खूप प्रेम होते.

अशा प्रकारे जीवन जगणारी माझी आई होती. तिच्या मार्गदर्शनामुळे व संस्कारामुळेच मला सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी वृत्तीने कष्ट करण्याची आवड निर्माण झाली.

इ.स. १९७२ मध्ये त्यांना अशक्तपणा जाणवू लागला. तिच्यावर वैद्यकीय उपचार केले. पण त्या थकतच होत्या. शेवटी माझ्या आईचे १५ डिसेंबर १९७३ रोजी दुःखद निधन झाले. मी मातृछायेला मुकलो व पोरका झालो. तिच्याशिवाय जगत असताना मला यातना होतात. परमेश्वरी इच्छेपुढे हतबल आहे हेच खरे!

माझ्या या देवतुल्य मातेच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

# कै. ह.ल. अंधारे गुरूजी–एक शिक्षक ते कुशल मुख्याध्यापक यांच्याविषयी थोडेसे...



कै. ह.ल. अंधारे गुरूजी

आज ७ डिसेंबर २०१८ श्री कुलस्वामिनी विद्यालय, तुळजापूर येथील स्थापनेपासूनचे पहिले मुख्याध्यापक हरिश्चंद्र लक्ष्मण अंधारे गुरूजी यांची पुण्यतिथी. त्यानिमित्त हे विचारपुष्प गुंफण्याचा अल्पसा प्रयत्न...

अंधारे गुरूजी हे एक हाडाचे शिक्षक होते. शाळा, विद्यार्थी, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास याविषयी एक विलक्षण तळमळ होती. ते अष्टपैलू व्यक्तीमत्त्व लाभलेले उत्तम शिक्षक होते. कुशल प्रशासक होते. ते बहुश्रुत, व्यासंगी आणि बहुआयामी व्यक्तीमत्त्व लाभलेले ध्येयवेडे शिक्षकांपैकी एक असे होते.

अंधारे गुरूजी हे मूळचे भूम तालुक्यातील चिंचपूर (ढगे) या गावचे. बालाघाट महाविद्यालय नळदुर्ग येथील सेवानिवृत्त प्राध्यापक आदरणीय नाना अहंकारी सर यांचे ते मित्र. त्यांच्या ओळखीने ते जवाहर विद्यालय अणदूर येथे आले. आदरणीय आलुरे गुरूजींच्या कृपेने जवाहर विद्यालयात अध्यापक म्हणून रूजू झाले आणि आपल्या अंगभूत कौशल्याच्या जोरावर आदरणीय गुरूजींचा विश्वास संपादन करीत जवाहर परिसरात एक उत्तम शिक्षक म्हणून अल्पावधीतच स्वत:चा लौकिक संपादन केला. 'एकच ध्यास शाळेचा व विद्यार्थ्यांचा विकास' या ध्येयावर अविचल निष्ठा ठेवून ते काम करीत राहिले. जवाहर विद्यालयाचा तो मंतरलेला काळ आणि त्या काळात आदरणीय गुरूजींच्या नेतृत्वाखाली श्री. सदाफुले गुरूजी, श्री. कदम गुरूजी, श्री. कुंभार गुरूजी, श्री. अंधारे गुरूजी ही सर्व गुरूजन मंडळी भान विसरून ध्येयाने, प्रेरित होऊन शाळेला वैभवाचे दिवस आणले. त्यामुळेच तो काळ भारावलेला ठरला. नंतर गुरूजी आमदार झाले. त्या काळात तुळजापुरातील डॉक्टर, वकील, इंजिनियर व प्रशासकीय अधिकारी वर्ग, शहरातील सुजाण, शिक्षणप्रेमी मंडळी यांच्याकडून तुळजापुरात एक जवाहर विद्यालयासारखी चांगली शाळा काढण्याची मागणी आदरणीय गुरूजींकडे होऊ लागली आणि त्यातूनच १९८३ मध्ये 'श्री कुलस्वामिनी विद्यालय तुळजापूर' या शाळेचा जन्म झाला. सुरूवातीला ही विनाअनुदानित शाळा. हे युनीट समर्थपणे चालविण्याची जबाबदारी कोणाकडे सोपवावयाची? हा प्रश्न समोर आला तेव्हा त्यासाठी आदरणीय गुरूजींनी श्री. ह.ल. अंधारे गुरूजी यांची सार्थ निवड केली. आदरणीय गुरूजींचा शब्द प्रमाण मानून अंधारे गुरूजींनी जवाहर विद्यालयातील पूर्ण पगाराची नोकरी सोडून विनाअनुदानित शाळेवर मुख्याध्यापक पदाची धुरा सांभाळत काम करीत राहिले. यातून आदरणीय गुरूजींवरील अविचल निष्ठा व त्याग हे त्यांच्या व्यक्तीमत्त्वातील गुण प्रकर्षाने प्रकट होतात. श्री कुलस्वामिनी विद्यालयात त्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास झाला. आदरणीय गुरूजींची मर्जी आणि आपले अंगभूत कौशल्य यांच्या जोरावर त्यांनी सुरूवातीच्य काळात आलेल्या स्थानिक अडचणींवर मोठ्या हिंमतीने मात करत तुळजापूर शहरात अल्पावधीतच शाळेचा लौकिक प्रस्थापित केला. श्री. माने सर, श्री. कोंडले सर, श्री. सोनवणे सर, श्री. माशाळकर सर, श्री. चिलोबासर, श्रीमती दीक्षित मॅडम, तांबे सर यांना सोबत घेऊन त्यांनी श्री कुलस्वामिनी विद्यालय या शाळेचा लौकिक वाढवून आदरणीय गुरूजींचा विश्वास सार्थ ठरविण्याचा प्रयत्न केला. हे सोपे कार्य नव्हते.

अंधारे गुरूजींच्या नेतृत्वाखाली श्री कुलस्वामिनी परिवाराचा विस्तार होत गेला. आज श्री कुलस्वामिनी प्राथमिक विद्यामंदिर, श्री कुलस्वामिनी विद्यालय, श्री कुलस्वामिनी उच्च माध्यमिक विद्यालय व महात्मा ज्योतीबा फुले रात्र प्रशाला, तुळजापूर हे युनिट कार्यरत असून या वेगवेगळ्या युनिटमधून जवळपास १५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. हे वैभव उभे करण्यासाठी अंधारे गुरूजींनी खूप मेहनत घेतली हे विसरता येणार नाही.

केवळ १० ते ४ या वेळेत शाळेत काम करणे हे अंधारे गुरूजींच्या लेखी कधीच बसत नाही. पहाटे ५.३०पासून ते रात्री १० वाजेपर्यंत ते सतत शाळेत रहायचे. मराठी, संस्कृत, इंग्रजी, इतिहास, भूगोल, हिंदी असे अनेक विषयाचे ते तितक्याच ताकदीने अध्यापन करीत असत. त्यामुळे त्यांच्या अध्यापनाचा नेमका विषय कोणता हे कोणाला कळणे कठीण होते. त्यांची वाणी ओघवती आणि तितकीच रसाळ होती. जोडीला ग्रंथसंग्रह आणि वाचनाचा व्यासंग होता. त्यामुळे त्यांची वकृत्वशैली उच्च कोटीची व प्रगल्भ स्वरूपाची होती. अनेक व्याख्याने, सभा, समारंभ आणि असंख्य व्यासपीठ त्यांनी गाजवली. अनेक मोठ्या समारंभाचे ते प्रभावीपणे सूत्रसंचालन करायचे. तुळजापूर शहरात उस्मानाबाद जिल्हा मुख्याध्यापक संघात त्यांनी आपला चांगला लौकिक सांभाळलेला होता. त्यांच्या वाणीइतकीच लेखणीही प्रभावी होती. गळ्यात शबनम आणि त्यात डायरी असायची. त्या डायरीत सतत रोजनिशी व सुंदर कोटेशन लिहित राहणे ही त्यांची सवय होती.

वाणी लेखणीसोबत त्यांच्या ठिकाणी अभिनय कौशल्य होते. एका उत्तम नटाचे गुण अंधारे गुरूजींकडे होते. असे आदरणीय

आलुरे गुरूजींच्या भाषणात अनेकवेळा उल्लेख आलेला आहे. भूम तालुक्यातील ढगे चिंचपूर या खेड्यात एका सामान्य कुटुंबात जन्म घेऊन जवाहर विद्यालय अणदूर येथे आपल्या कार्यकर्तृत्वास प्रारंभ करताना आदरणीय गुरूजींच्या परिसस्पर्शाने उजळून निघालेल्या अंधारे गुरूजींच्या कार्यकर्तृत्वावर श्री कुलस्वामिनी विद्यालयात कळस चढवला गेला. अंधारे गुरूजींचा हा जीवनप्रवास विलक्षण प्रेरणादायी असे. आज त्यांच्या स्मृती दिनानिमित्त श्री कुलस्वामिनी परिवार तुळजापूरच्यावतीने त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करून ही शब्दरूपी सुमनांजली अंधारे गुरूजींच्या चरणी समर्पित करतो.

श्री.शिवशंकर जळकोटे

(सहशिक्षक, श्री कुलस्वामिनी विद्यालय, तुळजापूर)

# आदर्श लोकमाता लक्ष्मीबाई आलुरे

भारतात अनेक ज्ञानतपस्वी, आर्थिक व सामाजिक कार्यकर्त्या जसे सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, झाशीची राणी आदी होऊन गेल्या. त्याच मालिकेतील लोकमाता लक्ष्मीबाई नागप्पा आलुरे यांनीही आपला प्रपंच मोठ्या कष्टाने सांभाळूत घरातील माणसांप्रमाणे गोरगरिब व गरजूंना मदत करीत असत. लोकांना मदत करणाऱ्या आक्का म्हणून त्यांनी समाजात आदर्श निर्माण केला.

'अतिथी देवो भव' या उक्तीप्रमाणे अन्नदान हे त्यांचे घराचे वैशिष्ट्य आहे. त्या खऱ्या अर्थाने अन्नपूर्णाच होत्या. घरी व शेतामध्ये कोणीही व्यक्ती आली तर जेवण केल्याशिवाय परत जात नव्हते. कोणीही अडचणीत असो, आजारी असो आक्का नेहमी त्यांच्या मदतीला धावून जात असत.




साने गुरूजींनी म्हटल्याप्रमाणे


जयाला धर्म प्यारा
तयाला देव तो प्यारा
तयाने प्रेममय व्हावे
जगाला प्रेम अर्पावे

त्याप्रमाणेच अन्नदानाच्या सेवेचे व्रत त्यांचे पुत्र माजी आमदार सी.ना. आलुरे गुरूजी हे पुढे चालवत आहेत. आज 'शिक्षण प्रसारक मंडळ' अणदूरमार्फत शेकडो मागासवर्गीय व अनाथ विद्यार्थी वसतिगृहाचा लाभ घेत आहेत. अक्कांच्या अन्नदानाचे व्रत आज वसतीगृहाच्या रूपाने गुरूजी चालवत आहेत.

अन्नदानाबरोबरच त्यात ज्ञानदानाची भर त्यांनी घातली आहे. प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयापर्यंत शिक्षणाची सोय अणदूरमध्ये गुरूजींनी केली आहे. अक्कांना वसतिगृहातील मुला-मुलींबद्दल अतिशय आपुलकी होती. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी १५ डिसेंबरला आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येते. आपल्या आईला गुरू मानून त्यांचे कार्य गुरुजी चालवत आहेत. एक निरक्षर महिला घराच्या चार भिंतीच्या आत राहून किती लोकसेवा करू शकते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे लोकमाता आक्का होय. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन.

– ति.गु. सालगे, अणदूर

# जवाहर विद्यालयात संविधान दिन साजरा



अणदूर (ता. तुळजापूर) येथील जवाहर विद्यालयांत २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला.

परिपाठात प्रथमता विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा.श्री. संगमेश्वर जळकोटे गुरूजी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर संविधान कसे घडले...? ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची बैठक झाली. डॉ. राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

१३ डिसेंबर रोजी जवाहरलाल नेहरूंनी घटना समितीत मांडलेल्या उद्देश पत्रिकेच्या घटनेचा सरनामा/प्रास्ताविक तयार करण्यात आले. त्या प्रास्ताविकेच्या चौकटीतच घटनेची निर्मिती करण्यात आली. घटना समितीने राज्य घटना तयार करणे, देशासाठी कायदे तयार करणे, भारताच्या राष्ट्रकूल सदस्यत्वास अनुमोदन देणे, भारताचा राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राष्ट्रगान स्वीकृत करणे, पहिल्या राष्ट्रपतीची निवड करणे, निवडणूक होईपर्यंत तात्पुरती संसद म्हणून कार्यभार पाहणे ही कामे केली. मसुदा समिती ही घटना निर्मितीतील मुख्य समिती होती. त्यामध्ये ७ सदस्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटनेच्या मसुद्याचा ठराव संमत करण्यात आला आणि २६ जानेवारी१९५० पासून संविधानानुसार भारत हा प्रजासत्ताक देश झाला. भारताची घटना निर्माण करण्यासाठी घटनाकर्त्यांनी जगातील जवळपास ६० देशांच्या घटनांचा विचार केला. घटनानिर्मितीसाठी २ वर्षे ११ महिने व १८ दिवसांचा कालावधी लागला. २६ नोव्हेंबर हा संविधान दिन (राष्ट्रीय विधी दिन) म्हणून भारतभर साजरा केला जातो, अशी संक्षिप्त माहिती श्री. सिद्धेश्वर मसुते गुरूजी व मु.अ.श्री. संगमेश्वर जळकोटे गुरूजी यांनी सांगितली. त्यानंतर उद्देशिकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले. संविधान दिनाच्या घोषणा देण्यात आल्या.

# जवाहर विद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा

अणदूर ता. तुळजापूर येथील जवाहर विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदरणीय श्री. सि.ना. आलुरे गुरूजी, संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. गोपीनाथ बिच्चे गुरूजी, म.अ. श्री. संगमेश्वर जळकोटे गुरूजी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून सभेच्या कार्यक्रमाची सुरूवात केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदरणीय गुरूजी होते.

विद्यालयातील बेले विशाखा, घोडके वैष्णवी, उकरंडे दिग्गजा, नवगिरे साक्षी, गायकवाड आम्रपाली, घोडके सौरभ, भरले स्वाती, देवशिंगकर रितेश या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, जलव्यवस्थापन, पुणे करार, महाड व नाशिक सत्याग्रह यावर, सामाजिक परिवर्तन



घडवून आणण्यासाठी केलेले प्रयत्न आपल्या भाषणातून व्यक्त केले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. एस.एन. जळकोटे गुरूजी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक, शैक्षणिक विचार आपल्या भाषणातून सांगितले.

त्यानंतर अध्यक्षीय समारोपात श्री. सि.ना. आलुरे गुरूजी यांनी विद्यार्थ्यांना त्यांचे चरित्र वाचा, त्यांच्या त्यागाचा विचार करा, सर्व धर्मसमभावाची भावना जपा, शिक्षणाशिवाय आपली उन्नती होणार नाही असे बाबासाहेब म्हणायचे ते तुम्ही स्वीकारा. समाजात अनेक प्रवाह आपण पहात आहोत. त्यांच्यापासून दूर रहा. नियमित अभ्यास करा. बाबासाहेब खूप अभ्यास करत होते म्हणून ते विद्वान झाले आणि त्यांचे कार्य अजरामर ठरले. त्यांचे काम मोठे होते म्हणूनच भारतात, परदेशात त्यांचे पुतळे उभे राहिले. म्हणून आपणसुद्धा देशासाठी काही तरी चांगले कार्य करावे, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले...! कार्यक्रमाचे सुंदर असे सूत्रसंचालन व आभार श्री. प्रवीण गुरव गुरूजी यांनी केले...!

